टोरांटोहून नियमितपणे प्रकाशित होणारे 'एकता' त्रैमासिक जानेवारी २००७ अंकापासून २९ व्या वर्षात पदार्पण करेल ही आपणा सर्वांना अभिमानास्पद व आनंददायक अशी घटना आहे. एकतामध्ये प्रामुख्याने भारताबाहेर स्थायिक झालेल्या मराठी बंधु–भगिनींचे साहित्य प्रसिद्ध करण्यात येते. वाचकांच्या भिन्न आवडी–निवडी पुरविणाऱ्या या नियतकालिकात उत्तम दर्जाच्या कथा, कविता, ललित लेख, प्रवासवर्णने, मननीय मुलाखती, सुरस कवितांची रसग्रहणे, वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तींचे परिचय, संस्कृत वाङ्मयातील लालित्य, श्रृंगार व विनोद, साहित्यभांडारात मौलिक भर घालणाऱ्या नवीन पुस्तकांचे परिचय, महाराष्ट्रातील बातम्यांचे सार, शब्दकोडी, समस्यापूर्ति स्पर्धा, 'चित्रगुप्त', कथास्पर्धा, इत्यादी विविध व चटकदार सदरे वाचायला मिळतात.

या नियतकालिकाचा आस्वाद अनुभवण्यासाठी 'एकता'ची प्रत मिळवणे आवश्यक आहे. तुम्ही 'एकता'चे वार्षिक वर्गणीदार झाल्यास तुमच्या संग्रही एका दर्जेदार कलाकृतीची भर पडेल. 'एकता'ची वार्षिक वर्गणी २३ डॉलर्स आहे. (आजीव वर्गणीदार — ३५० डॉलर्स). वर्गणीदार होऊन आपण ह्या उपक्रमास सक्रिय पाठिंबा द्याल अशी आशा आहे.

अधिक माहितीसाठी कृपया संपर्क साधा —

दूरध्वनी : ४१६–४९७–३५४६

e-mail: ekata@canada.com

वेबसाइटला भेट द्या — www.ekata.ca